# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ६
## सभावृत्तांत

दिनांक - ४/११/२०१९ वेळ - **सकाळी ११ :००** वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.४/११/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे अर्चना तानाजी – सभापती
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.भोसले सचिन सुरेश
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
९. मा.सुनिता हेमंत तापकीर
१०. मा.चंद्रकांत बारकु नखाते
११. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१२. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री रमेश वस्ते - प्रशासन अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्रीमती अमृता लागु - लेखाधिकारी, श्री.एस.डी.निंबाळकर – आरोग्य निरीक्षक, श्री.गट्टुवार – कार्यकारी अभियंता, , बीआरटीएस, श्री.विनय ओहोळ – उपअभियंता, स्थापत्य, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता, स्थापत्य,श्री.अतुल जोशी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.बाबासाहेब गलबले – कार्यकारी अभियंता,विद्युत, श्रीमती अनुश्री कुंभार – उपअभियंता विद्युत, श्री.पी पी पाटील – कार्यकारी अभियंता,श्री.मोने उमेश – उपअभियंता,जलनि:सारण, श्री.बोरसे एम डी, श्री.रोकडे जयवंत, श्रीमती गोखले एस एन – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री सतिष तायडे– कनिष्ठ अभियंता,विद्युत, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.नरोटे एस एस – उपअभियंता, स्थापत्य उद्यान श्री.कदम सी.टी – मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, थेरगाव ,श्री.डी.एन.गायकवाड – उद्यान अधिक्षक,श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, इ.कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत आली.

दि. ४/०९/२०१९ रोजीचे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र.५ ) कायम करणेत आला .

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - १

दिनांक- ०४/११/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

**संदर्भ –** मा. माया बारणे यांचे दिनांक १७/६/२०१९ चे पत्र

मा.माया बारणे यांचे दिनांक १७/६/२०१९ चे पत्रानुसार मौजे थेरगाव सर्वे नं.१४/२ जयभवानी नगर सदर भागातील वाढती रहदारी लक्षात घेता ९ मीटर रस्ता करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये मान्यता देणे कामी व सुचना व हरकती अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कारवाई करण्याकरीता व शासनाला सदर प्रस्ताव सादर करण्यास माननीय आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - २

दिनांक- ०४/११/२०१९

सूचक- मा. अनुमोदक- मा.

**संदर्भ –** मा. संदिप वाघेरे यांचे दिनांक ८/०७/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक ८/०७/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी प्रभाग क्र.२१ मधील गंगवा चौक (नवमहाराष्ट्र विद्यालयामागे) येथे सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झालेली असुन सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले असुन नागरिक सदरचे शौचालय पाडण्याची विनंती करीत आहेत. परिसरातील बहुतांश नागरिकांनी वैयक्तिक शौचालय बांधुन घेतलेली आहेत. तरी सदर विषयास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - ३

दिनांक- ०४/११/२०१९

सूचक- मा. अनुमोदक- मा.

**संदर्भ –** मा.सुनिता तापकीर यांचे दिनांक ८/०७/२०१९ चे पत्र

मा.सुनिता तापकीर यांचे दि.८/७/२०१९ चे पत्रानुसार मौजे रहाटणी येथील स.न.६७,६८,६९ व ७१ या परिसरातील रस्ते कलम २०५ अन्वये घोषित करणेत यावे. मौजे रहाटणी येथील पुढीलप्रमाणे नागरिकांचे सोयीचे दृष्टीने आवश्यक असलेने ते महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करणेत यावा, तसेच स.नं.५९ मधील पुर्व – पश्चिम १२.०० मी डी पी रस्त्यापासुन उत्तरेकडे जाणारा व तेथुन पुढे यश कॉलनी स.न.६६,६७ च्या हद्दीवर पश्चीमेकडे जाण्यासाठी ६.०० मी.रस्त्याची आवश्यकता असलेने सदरचे रस्ते महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषय दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

-----

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ४

दिनांक- ०४/११/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

**संदर्भ –** मा. झामाताई बारणे यांचे दिनांक ५/०८/२०१९ चे पत्र

मा.झामाताई बारणे यांचे दिनांक ५/०८/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२४ येथील वाकड पोलिस स्टेशन ( आयईवना सोसायटी) समोरील चौकास लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे. थेरगाव डांगेचौक येथील बीआरटी रस्त्यावरील उड्डाणपुलावर छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे नाव दिलेले आहे, सदर परिसर (चौक) डांगे चौक या नावाने संपुर्ण शहरात ओळखला जातो. तरी पुलावरती डांगे चौक नावाचा उल्लेख करावा, सदर दोन्ही ठिकाणाचे नावाचे फलक तयार करुन लवकरात लवकर लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

-----

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ५

दिनांक- ०४/११/२०१९

सूचक- मा.झामाबाई बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.झामाबाई बारणे यांचे दिनांक ४/११/२०१९ चे पत्र

मा.झामाबाई बारणे यांचे दिनांक ४/११/२०१९ चे पत्रानुसार, थेरगाव प्रभाग क्र.२४ मधील स.२२/१ मध्ये तुळजाई कॉलनी १ संचेती शाळा कमान पासुन टायगर जिम पर्यंत मनपा रस्ता अस्तित्वात आहे. त्यापुढील रस्ता नसलेने सागर प्रोव्हीजन स्टोअर्स पासुन टायगर जिम मागील नाल्यापर्यंत ९ मी रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करुन सदर रस्ता विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ६

दिनांक- ०४/११/२०१९

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा. कैलास बारणे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक ४/११/२०१९ चे पत्र

मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक ४/११/२०१९ चे पत्रानुसार थेरगाव फाटा ते थेरगाव गावठाण रोड वरील वनदेव नगर अभिजित पार्क चौक यास लोकांच्या मागणीनुसार कोकोनट कॉर्नर असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ ५०/२०१९
दिनांक - २०/११/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.